वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि. ५ सप्टैंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# चार मृत्यूने जिल्हा हळहळला

## दगडवाडीत मेंढपाळाच्या डोक्यात दगड घालून खून

Email.- dailydivyawarta@Gmail.com
Email.-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

### १९ वर्षाचा तरुण जागीच ठार; आरोपी फरार;पोलीस घटनास्थळी





पाटोदा , (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यात खुनासारख्या गंभीर घटना सातत्याने घडत असून परवा बीड शहरात खुनाची घटना घडल्यानंतर आज शिरूर तालुक्यातील रायमोह परिसरातील दगडवाडी येथे एक खुनाची घटना उघडकीस आली आहे. नाशिक येथील मेंढपाळ आपल्या मेंढ्यांसह रायमोह परिसरात आलेले आहेत. यामध्ये मेंढ्या सांभाळणारा दीपक केरा भिल्ल (वय १९, रा. बर्हाणपूर, मध्य प्रदेश) याचा डोक्यात दगड घालून खून करण्यात आला आहे. सदरची घटना आज सकाळी पहाटेच्या दरम्यान घडली. खून करणारा आरोपी घटनास्थळावरून फरार झाला आहे. या खुनाच्या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विलास एकनाथ भोसले (वय ५२, रा. वैजापूर, जि. संभाजीनगर) याने दीपकवर वैयक्तिक कारणातून हल्ला केला. पहाटेच्या सुमारास अचानक झालेल्या या हल्लूयात भोसले याने मोठा दगड उचलून दीपकच्या डोक्यावर प्राणघातक वार केला. या हल्लूयात दीपक जागीच ठार झाला. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला.या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी रायमोहा पोलिस चौकीला कळवले. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. एका निष्पाप मेंढपाळ तरुणाचा असा खून झाल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. बीड

▶▶ पान २ वर

## विद्युत खांबाला धडकून तरुणाचा जागीच मृत्यू



आष्टी, (दिव्य न्युज):- बीड ते अहिल्यानगर राज्य महामार्गावरील घाटपिंपरी येथे तरूणाचा दुचाकीवरील ताबा सुटल्याने रोडलगत असलेल्या विद्युत खांबावर दुचाकी धडकली. यात दुचाकीस्वार तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना गुरूवारी रात्री ११ वाजेच्या दरम्यान घडली. राहूल अशोक कोकरे (२६) असे मृत तरूणाचे नाव आहे. आष्टी तालुक्यातील घाटपिंपरी येथील राहूल अशोक कोकरे (२६) हा धामणगावहून गुरूवारी रात्री दुचाकीवरून गावाकडे निघाला होता. गावाजवळ येताच एका वळणार दुचाकीवरील ताबा सुटल्याने रोडलगत असलेल्या विद्युत खांबावर दुचाकी धडकली. या अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला. धामणगांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी डॉ. पूजा रणवीर यांनी शवविच्छेदन केले. अंभोरा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस फौजदार सोपान येवले, होमगार्ड तुषार वामन यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. दरम्यान, आज सकाळी शोकाकुल वातावरणात घाटपिंपरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## माळीवेस भागात नालीत मृतदेह आढळला



बीड, (दिव्य न्युज):- शहरातील माळीवेस भागातील एका नालीमध्ये मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती शहर पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जावून पंचनामा केला. सदरील मयताची दुपारी ओळख पटली आहे.

शहरामधील माळीवेस परिसरातील नालीत सकाळी मृतदेह आढळून आला. याची माहिती शहर पोलिसांना झाल्यानंतर पो.नि. शितलकुमार बल्लाळ सह आदीनी घटनास्थळी जावून पंचनामा केला.सदरील मयताची दुपारी ओळख पटली असुन त्याचे नाव उमेश गोविंदराव घटे (वय ५२, रा. अयोध्या नगर पेठ बीड) असे आहे.

## राजुरीजवळ मोटारसायकल अपघात हनुमंत तावरे यांचा मृत्यू

न.राजुरी, (दिव्य न्युज):-बीडपासून काही अंतरावर असलेल्या राजुरी रोडवरील जिओ पेट्रोलपंपासमोर रात्री साडेसहा वाजण्याच्या सुमारास हनुमंत तावरे मोटारसायकलवरून राजुरी येथून बीडकडे येत असताना एका बैलगाडीला मोटारसायकलची धडक बसली. यामध्ये ते जखमी होऊन त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.



आज सकाळी त्यांच्या पार्थीवदेहावर अंकुशनगर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आला. हनुमंत तावरे हे अॅड. गणेश तावरे यांचे वडील होते. तावरे कुटुंबियावर कोसळलेल्या दुःखात दिव्य वार्ता,कश्मकश परिवार सहभागी आहे.




## ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद






बीड (दिव्य न्युज):- ईद-ए-मिलादुन्नबी निमित्ताने सामाजिक उपक्रम राबवित आज शुक्रवारी (दि.५) बशीरगंज चौक येथे रक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी अनेकांनी रक्तदान करुन या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी अनेक मान्यवरांनी रक्तादान केले. जगाला बंधूभाव आणि शांततेचा संदेश देणारे पैगंबर हजरत मोहम्मद स. यांचा योमे विलादत म्हणून १२ रब्बीउल अव्वल पान २ वर हा दिवस ईद-ए-मिलादुन्नबी म्हणून साजरा करण्यात ▶▶ पान २ वर

## अनुकंपा तत्वावरील ९ हजार ६५८ जागा १५ सप्टेंबरपर्यंत भरल्या जाणार

मुंबई , (दिव्य न्युज):- राज्य सरकारने अनुकंपा तत्वावरील रखडलेल्या नियुक्त्यांबाबत मोठा निर्णय घेतला आहे. राज्यभरातील तब्बल ९ हजार ६५८ जागा १५ सप्टेंबरपर्यंत भरल्या जाणार आहेत. या भरतीत चतुर्थ श्रेणीतील पदांचाही समावेश असून, राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर अनुकंपा तत्वावरील भरती होत आहे.

मृत शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना दिलासा देण्यासाठी सरकारने ही प्रक्रिया जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्याचे ठरवले आहे. यापूर्वी या जागा

▶▶ पान २ वर



### बालाघाटाचा अस्तित्व धोक्यात!

## गौण खनिज माफियांचा धुडगूस,प्रशासन मूकदर्शक

बीड, (दिव्य न्युज):- जिल्ह्याला वेढून असलेल्या बालाघाट डोंगररांगा आज अस्तित्वाच्या संकटात सापडल्या आहेत. गौण खनिज माफियांनी अक्षरशः डोंगर पोखरून टाकले, तर प्रशासन डोळ्यावर पट्टी बांधून बसल्याची भावना जनतेत व्यक्त होत आहे.

▶▶ पान २ वर

## सर सय्यद अहेमद खान सेमी इंग्रजी आणि पिपल्स हायस्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा



बीड, (दिव्य न्युज):- दिनांक ४ सप्टेंबर गुरुवार रोजी सर सय्यद अहेमद खान सेमी इंग्रजी आणि पिपल्स हायस्कूलमध्ये शिक्षक दिन मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मुलांसाठी बनवलेले व सजवलेल्या ऑफिस ची फीत कापून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शिक्षकांप्रमाणे संपूर्ण शाळा हाती घेतली व सर्व वर्गात वेगवेगळे विषय शिकविले.

▶▶ पान २ वर

# फोन करुन अजित पवारांना अडचणीत आणणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल; सरकारी कामात अडथळा

मुंबई, (दिव्य न्युज):- राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिस्तप्रीय नेते म्हणून ओळख असलेल्या अजित पवारांनी (-क्षळीं रिुरी) एका महिला पोलीस अधिकाऱ्यास फोनवरुन दादागिरी केली. अजित पवारांच्या या संवादाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, माध्यमांत हे वृत्त झळकल्यानंतर आता संबंधित गावातील शेतकरी आणि फोन लावणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. त्यामुळे, अखेर अजित दादांना अडचणीत आणणाऱ्या कुर्डू (डेश्ररींी) येथील १५ ते २० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याचं दिसून आलं. त्यामध्ये, बाबा जगताप, नितीन माळी, संतोष कापरे, अण्णा धाणे यांच्यासह १५ ते २० ग्रामस्थांचा समावेश असून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी, ग्राम महसूल अधिकारी प्रीती शिंदे यांनी फिर्याद दिली आहे.

गावातील मुरूस उपसा करताना अडवणूक केल्यानंतर येथील एका कार्यकर्त्याने थेट उपमुख्यमंत्री अजित पवारांना फोन लावून कारवाई थांबविण्याची विनंती केली होती. त्यावेळी, अजित पवारांनीही फोनवरुन संबंधित महिला अधिकाऱ्यास कारवाई थांबवा, मी तुम्हाला आदेश देतो असे म्हणत दादागिरीची भाषा केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यामुळे, अजित पवारांवर टीकेची झोड उठल्याने आता संबंधित ग्रामस्थांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. कुर्डूवाडी पोलीस ठाणे गु.र.नं ३७१/२०२५ बी.एन.एस.चे कलम ३०३(२),३(५) व पर्यावरण संरक्षण अधिनियम ९.१५ प्रमाणे फिर्यादी-प्रीती प्रकाश शिंदे वय २७ वर्ष धंदा नोकरी (ग्राम महसूल अधिकारी कुर्डू) रा. मोडनिंब ता. माढा जिल्हा सोलापूर यांनी याबाबत तक्रारदाखल केली आहे.कुर्डूतील श्री दादाराव गोरख माने यांची शेती गट नंबर ५७५/१ मधील ०.२० आर जमिनीमधील अंदाजे १२० ब्रास मुरूम रक्कम अंदाजे ७२,००० हजार रुपये, बाहेर काढल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी संगणमत करुन तहसीलदार माढा यांची कोणतीही परवानगी न घेता पर्यवरणाचा ऱ्हास करुन मौजे कुर्ड शेती गट नंबर ५७५/१ मधील शेतकरी श्री दादाराव गोरख माने यांच्या मालकीचे ०.२० आर. जमीनमधील अंदाजे १२० ब्रास मुरुम प्रति ब्रास ६००/- रुपये प्रमाणे एकूण ७२,०००/- रुपयांचा मुरुम अवैद्यरित्या उत्खनन करन चोरी केल्याची तक्रार दाखल झाली आहे. याशिवाय जमाव जमवून सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे.

माढ्याच्या कुर्डू गावात रस्त्यासाठी मुरुम उत्खनन होत असल्याची तक्रार आल्यानुसार करमाळ्याच्या पोलिस उपअधिक्षक अंजना कृष्णा या घटनास्थळी पोहचल्या. मुरुम उचलण्याच्या मुद्यावरुन कुर्डू गावातील नागरीक आणि अंजली कृष्णा यांच्यामध्ये




शाब्दिक जुगलबंदी रंगली. यादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाबा जगताप या कार्यकर्त्याने थेट उपमुख्यमंत्री अजित पवारांना फोन लावून अंजली कृष्णा यांच्या हातात दिला. मात्र त्यांना अजित पवार आणि त्यांचा आवाज ओळखता आला नाही. तिकडून अजित पवार दोनदा सांगताना दिसले की डीसीएम अजित पवार बोल रहा हूं. ये कार्यवाही बंद करो...मेरा आदेश हैं.. त्यावर कृष्णा म्हणतात मेरे फौन पर कॉल करें..त्यावर पवार म्हणताहेत..की तुम पे ॲक्शन लूंगा.. इतनी डेरिंग है तुम्हारी..मेरा चेहरा तो पेहचानोगा ना.. असे रागावून अजित पवार बोलले ... आणि अजित पवारांनी व्हिडीओ कॉल केला.त्यावर कृष्णा बांधावरच जाऊन बसून पवारांशी बोलताना दिसल्या...यात अजित पवार कारवाई थांबवण्याचे आदेश देत असल्याचे पहायला मिळत असून...माझा फोन आलाय...तहसीलदारांना सांगा असे पवार सांगतात. घटनास्थळी हा प्रकार ३ तास चालू होता. अंजली कृष्णा आणि पवारांच्या संवादाच्या क्लिप व्हायरल झाला आहे. या प्रकरणी पोलिसांकडे कसलीही तक्रार अथवा गुन्हांची नोंद झालेली नाही. काल दुपारी हा सर्व प्रकार घडला. अवैध मुरूम उपसा सुरू असताना आयपीएस महिला अधिकाऱ्याने तेथे धाड टाकून कारवाई सुरू केली असता अजितदादांच्या कार्यकर्त्यांनी थेट दादांना फोन लावून दिला होता. वास्तविक ग्रामपंचायतच्या परवानगीने मुरूम उपसा होत असल्याची भूमिका ग्रामस्थांची होती, मात्र कोणतीही ग्रामपंचायत अथवा कागदपत्र सादर न झाल्याने महिला आयपीएस अधिकाऱ्याने कारवाई केली होती. दरम्यान, करमाळ्याच्या पोलिस उपअधिक्षक अंजली कृष्णा यांना उपमुख्यमंत्री अजित पवारांना फोनवरुन ओळखता आले नाही. त्यानंतर रागावलेल्या अजित पवारांनी अंजली कृष्णा यांना खडेबोल सुनावत थेट व्हिडीओ कॉलच केला होता.

# वडील धोरणं बनवतात आणि मुलं त्यातून पैसे कमवतात, नितीन गडकरींवर काँग्रेसची टीका

मुंबई, (दिव्य न्युज):- इथेनॉल धोरणामुळे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहेत. अशात, आता गुरुवारी काँग्रेसने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यावर मोठा हल्लाबोल केला. काँग्रेसने म्हटले आहे की, नितीन गडकरी यांच्या मुलांच्या इथेनॉल उत्पादक कंपन्यांनी गेल्या काही काळात वेगाने पैसे कमवले आहेत.

काँग्रेस प्रवक्ते पवण खेरे यांनी आज पत्रकार परिषदेत म्हटले की, निखिल गडकरी आणि सारंग गडकरी हे नितीन गडकरी यांचे पुत्र आहेत. नितीन गडकरींच्या दोन्ही पुत्रांच्या सियान ॲग्रो इंडस्ट्रीज अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि मानस ॲग्रो इंडस्ट्रीज अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपन्य इथेनॉलचे उत्पादन करतात. सरकारमध्ये असलेले वडील धोरणे बनवत आहेत आणि मुले पैसे कमवत आहेत.

काँग्रेस नेते पवन खेरा म्हणाले की, जून २०२४ मध्ये निखिल गडकरी यांची कंपनी सियान ॲग्रोचा महसूल १८ कोटी रुपये होता, जो जून २०२५ मध्ये वाढून ७२३ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. जानेवारी २०२५ मध्ये या कंपनीच्या शेअरची किंमत ३७ रुपये होती, जी आता ६३८ रुपये झाली आहे.पवण खेरा पुढे म्हणाले की, गेल्या ११ वर्षांत कोणतीही योजना वेळेवर पूर्ण झाली नाही, परंतु देशाने २०२५ च्या अंतिम मुदतीपूर्वी २० टक्के इथेनॉल मिश्रण साध्य केले आहे.या पत्रकार परिषदेत पवण खेरा पुढे म्हणाले की, नरेंद्र मोदी आणि नितीन गडकरी यांनी जून २०१४ मध्ये सांगितले होते की, महानगरपालिकेच्या कचऱ्यापासून तयार होणाऱ्या इथेनॉलमुळे पेट्रोल ५५ रुपये प्रति लिटर आणि डिझेल ५० रुपये प्रति लिटर दराने उपलब्ध होईल. सप्टेंबर २०१८ मध्ये नितीन गडकरी म्हणाले होते की, सरकार पाच असे प्लांट उभारेल जिथे भूसा आणि



महानगरपालिकेच्या कचऱ्यापासून इथेनॉल तयार केले जाईल. सत्य असे आहे की, आजपर्यंत भूसा आणि महानगरपालिकेच्या कचऱ्यापासून १ लिटरही इथेनॉल तयार झालेले नाही.

६२७ कोटी लिटर इथेनॉलचे उत्पादन झाले आहे, ज्यामध्ये ५६ टक्के ऊस आणि उर्वरित धान्य वापरले गेले आहे. लाकडाचा भूसा आणि महानगरपालिकेचा कचरा कुठेही वापरला गेला नाही. १ लिटर इथेनॉल बनवण्यासाठी सुमारे ३,००० लिटर पाणी वापरले जाते. म्हणजेच पर्यावरणाचे रक्षण करण्याचा दावा देखील केवळ घोषणा ठरला, असेही खेरा म्हणाले.


# ओम कोचिंग क्लासेसमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा

## विद्यार्थ्यांनी अनुभवली शिक्षकांची भूमिका

पाटोदा, (दिव्य न्युज):-पाटोदा येथील नामांकित ओम कोचिंग क्लासेस मध्ये शिक्षक दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. ५ सप्टेंबर या दिवशी स्वतंत्र भारताचे पहिले उपराष्ट्रपती आणि दुसरे राष्ट्रपती यांच्या जन्मदिनी सर्व भारतामध्ये शिक्षक दिन साजरा केला जातो. याच शिक्षक दिनाचे औचित्य साधून पाच सप्टेंबर रोजी पाटोदा येथील ओम कोचिंग क्लासेस मध्ये शिक्षक दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी हा शिक्षक दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला.

शिक्षक दिन या कार्यक्रमाची रूपरेषा विद्यार्थ्यांनी क्लासेसचे संचालक प्रा.सोमीनाथ खंडागळे सर यांच्या मदतीने आखली व कार्यक्रम योग्यरीत्या पार पाडला.विद्यार्थ्यांनी अनुभवली शिक्षकांची भूमिका क्लासेसमधील वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांनी कनिष्ट वर्गास अध्यापन करत पहिल्यांदा शिक्षकांची भूमिका अनुभवली. यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर अवीट गोडी झळकत होती.

या अध्यापनात कु.कल्याणी दादासाहेब गायके,कु.प्रणिता नामदेव ससाणे,कु,सिद्धी श्रीकृष्ण तांबे,कु.प्रेरणा भागवत शिंदे,कु.यशश्री बाळकृष्ण पाखरे,कु.श्रविका सोमीनाथ खंडागळे आणि दीपक बाळासाहेब



चौरे आदि विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत यशस्वीपणे अध्यापनाचे कार्य पार पाडले. तद्नंतर क्लासेसच्या सभागृहांमध्ये शिक्षक दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनींनी गायलेल्या स्वागत गीताने झाली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि अध्यक्ष आणि इतर शिक्षकांना शाल आणि श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. शिक्षक दिनानिमित्त क्लासेसचे संचालक प्रा.सोमीनाथ खंडागळे आणि कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांनी शिक्षकाचे महत्त्व, समाजात असलेली शिक्षकाची गरज या विषयी भाषणे दिली.शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रमाचे कार्यक्रमांमध्ये भाषण स्पर्धा सुद्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये विविध वर्गातील विद्यार्थी विद्यार्थिनींनी आपापले भाषणे सादर केली. भाषण स्पर्धेनंतर विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस आणि प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या सन्मान करिता त्यांना पुष्पगुच्छ दिले आणि त्यांचे आभार मानले आणि सर्वात शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन घेण्यात आले आणि कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ओम कोचिंग क्लासेसचे संचालक प्रा.सोमीनाथ खंडागळे, संचालिका प्रा.पूनम खंडागळे यांच्यासह क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

पान ४ वरून

## खासगी ट्युशन क्लासेसबाबत

बारावीच्या बोर्ड परीक्षांसाठी आणि अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांसाठी पुणे, नागपूर, दिल्ली, कोटा यांसारख्या शहरांत कोचिंग क्लासेसची भरभराट झाली.

त्यानंतर युपीएससी, एमपीएससी, आयआयटी, नीट अशा स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी खासगी कोचिंग मोठा उद्योग म्हणून विकसित झाला. आज परिस्थिती अशी आहे की लहान वर्गापासून उच्च शिक्षण घेत असलेले विद्यार्थी ट्युशन किंवा कोचिंग क्लासेशिवाय अभ्यास पूर्णच होत नाही, अशी मानसिकता पालक-विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातसुद्धा ऑनलाईन व ऑफलाईन दोन्ही माध्यमांतून खासगी कोचिंगची मागणी वाढली असून ते शिक्षणव्यवस्थेचा एक अविभाज्य घटक बनले आहे. आता केंद्र शासनाने अकरावी- बारावीच्या खासगी ट्युशन क्लासेसबाबत महत्वाची माहिती दिली आहे.

## डॉ.झाकीर हुसेन

होते त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. व तसेच आदर्श शिक्षिका सिद्दिकी जरीना नाहीद यांचा शाल, हार, प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आले. संस्थेचे सहसचिव मौजन सिराजोदिन आणि आमच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य पठाण मुनवरी बेगम हसन खान यांनी आदर्श शिक्षिका चा सत्कार केला. व तसेच मौजन कलीम सरांनी मार्गदर्शन केले. सिद्दिकी जरीना नाहीद यांना हा पुरस्कार त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी,कार्यालयीन कामे,विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी घेतलेले अथक कष्ट-परिश्रम तसेच मेहनत, शाळेच्या गुणवत्ता तसेच शिस्त याच्यात केलेल्या सुधारणे बरोबरच विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी हा पुरस्कार देण्यात आला. अवतरणपणे केले व पुढेही करत आहे. शैक्षणिक क्षेत्रात ३२ वर्ष कार्यरत असलेले मुख्याध्यापिका सिद्दिकी जरीना नाहीद यांचे नेतृत्व, शिस्त, शिक्षक, पालक,विद्यार्थ्यांच्या सोबतचे संवाद व तसेच आपल्या सहकार्यासोबतचे संवाद कौशल्य आणि विद्यार्थ्यांचे गरजा ओळखून त्यांचे भविष्य निर्धारसाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. मुख्याध्यापिका म्हणून डॉ. झाकीर हुसेन उर्दू प्राथमिक शाळेत शैक्षणिक वर्ष १९९४ व १९९५ वर्षापासून मुख्याध्यापिका पदी नेमणूक झाल्यापासून आज पर्यंत त्यांनी प्रशालेमध्ये अनेक शैक्षणिक बदल करून विद्यार्थ्यांना नवनवीन संधी उपलब्ध करून दिल्या, ज्यात अनेक विद्यार्थी ओलंपियाड, शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झाले, व तसेच शिक्षक- पालक मेळावे, खेळ,शैक्षणिक सहल, सांस्कृतिक कार्यक्रम त्यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. तसेच विद्यार्थ्यांसाठी अनेक शैक्षणिक संधी उपलब्ध करून देऊन त्यांना समाजातील एक जबाबदार नागरिक म्हणून घडवत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी अनेक क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटवत असून शाळेची गुणवत्ता उंचवताना दिसत आहेत.

शिक्षक समाजाला मार्गदर्शक असतात, मुख्याध्यापिका सिद्दिकी जरीना नाहीद यांच्यासारखे मुख्याध्यापिका हे समाजाचे एक आदर्श निर्माण करत असतातअसे प्रतिपादन प्राचार्या पठान मुनवरी बेगम हसन खान यांनी केले. शिक्षण क्षेत्रातील भर देण्यामान कार्याला असेच सातत्याने सक्षमपणे पुढे नेण्याचा त्यांचा असाच निरंतर प्रयत्न आणि प्रवास राहणार आहे. मुख्याध्यापिका सिद्दिकी जरीना नाहीद यांना संस्थेतर्फे आदर्श शिक्षक म्हणून गौरविण्यात आले. त्यांना माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यातर्फे हार्दिक हार्दिक शुभेच्छा...!

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन: अन्सारी साईदोदिन यांनी केले व शेख आयुब काकर सर यांनी सर्वांचे आभार मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षक तर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## इमानदार शिक्षकांना ईश्वरीय

शिक्षकांच्याच विश्वासावर मुलांचे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवतात, शिक्षक आपल्या मेहनत इमानदारीने मुलांना शिक्षण देऊन समाजाला दशा दिशा देण्याचे काम करतोय म्हणून इमानदारीने मुलांना शिकविणारे शिक्षक हे समाजासाठी ईश्वरीय वरदान आहे म्हणून समाजानेही शिक्षकांचे आदर करावे कारण समाजाचे शिक्षकांना सम्मान करणे हेच शिक्षकांसाठी सर्वांत मोठा पुरस्कार आहे, तसेच जे शिक्षक आपल्या कर्तृत्वात कामचुकार पणा करत असेल तर अश्यांना इमानदार समाजसेवकांनी पुढे येऊन धडा शिकवावा असेही आवाहन खुर्शीद आलम यांनी केले आहे, यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकांचे सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आले आहेत, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंदन पठाण सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सफदर देशमुख सर यांनी केले आहे,

पान १ वरून

## १९ वर्षाचा तरुण

जिल्ह्यात अलिकडच्या काळात सलग घडणार्या खुनांच्या घटनांमध्ये आणखी एका घटनेची भर पडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

या प्रकरणी पाटोदा पोलिस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. पोलिस निरीक्षक संभाजी तागड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांची पथके आरोपीचा शोध घेत असून, पोलिसांनी आरोपी विलास भोसलेला शक्य तितक्या लवकर ताब्यात घेण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.मृत दीपक केरा भिल्ल याचा मृतदेह पोलिसांनी पंचनामा करून पोस्टमार्टेमसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवला. दीपक आपल्या कुटुंबासोबत मेंढ्या चारण्याच्या व्यवसायातून उदरनिर्वाह करत होता. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे त्याच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

दरम्यान, या खुनामागील नेमके कारण अद्याप समजू शकले नसले तरी पोलिसांनी या प्रकरणात गंभीर दखल घेतली आहे. आरोपीला लवकरच अटक करून न्यायालयीन प्रक्रिया पुढे नेण्यात येईल, अशी माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे.

## ईद-ए-मिलादुन्नबी

येतो. आज शुक्रवारी दि.५सप्टेंबर रोजी १२ रब्बीउल अव्वल असून या निमित्ताने बशीरगंज येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी वक्फ बोर्डाचे चेअरमन समीर काझी यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी फारुख पटेल, सुशीला मोराळे, अश्फाक इनामदार, तहसीलदार चंद्रकांत शेळके, पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अनेकांनी रक्तदान करुन या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी सिटी ब्लड बँकेचे डॉक्टर, कर्मचाऱ्यांनी संकलन केले.

## सर सय्यद अहेमद खान

भाषण,व कवितावाचन या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे महत्व अधोरेखित केले.

इयत्ता पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांना इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यानी अध्ययन केले. शिक्षक कशाप्रकारे आपल्याला शिकवतात हे त्यांच्या लक्षात आले. या कार्यक्रमाला जे विद्यार्थी मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, क्लार्क यांची भूमिका केली त्यांना बक्षिसे देण्यात आली तसेच उत्कृष्ट शिक्षण करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. या प्रसंगी शाळेचे सचिवांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला व शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील नातेसंबंध अधिक दृढ राहावेत असे प्रतिपादन केले.शिक्षक दिनाच्या या सोहळ्यामुळे शाळेचे वातावरण आनंदमय झाले होते.

## अनुकंपा तत्वावरील ९

खाजगी कंत्राटदारांमार्फत भरल्या जात होत्या, मात्र आता प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांचे स्वप्न पूर्ण होणार आहे.१९७३ पासून लागू असलेल्या अनुकंपा धोरणानुसार सेवेत असताना कर्मचाऱ्यांचे निधन झाल्यास त्यांच्या पात्र वारसाला गट-क किंवा गट-डमधील नोकरी देण्याची तरतूद आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या नियुक्त्यांमुळे राज्यभरातील सुमारे १० हजार उमेदवारांना दिलासा मिळणार आहे.

सध्या महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषदांमध्ये एकूण ९ हजार ५६८ उमेदवार प्रतीक्षेत आहेत. यामध्ये महानगरपालिकांतील ५,२२८, जिल्हा परिषदांतील ३,७०५ आणि नगरपालिकांतील ७२५ उमेदवारांचा समावेश आहे. जिल्हानिहाय पाहता नांदेडमध्ये सर्वाधिक ५०६ उमेदवार प्रतीक्षेत असून, त्यानंतर पुणे ३४८, गडचिरोली ३२२ आणि नागपूर ३२० उमेदवारांचा क्रमांक लागतो.राज्य सरकारच्या या निर्णयामुळे हजारो कुटुंबांना रोजगारासह आर्थिक दिलासा मिळणार आहे.

## गौण खनिज माफियांचा

मर्यादेपेक्षा कितीतरी पटीने जास्त खनिज उपसा सुरू असून, अवैध उत्खननाचे थैमान दिवसेंदिवस वाढत आहे. जंगल, झाडी आणि डोंगररांगा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. परिणामी, भूजलपातळी झपाट्याने खाली जात आहे, मातीची धूप वाढत आहे आणि भविष्यात बीड जिल्हा ओसाड व उजाड होईल, अशी गंभीर भीती निर्माण होत आहे.पर्यावरणप्रेमी व तज्ज्ञांचा इशारा जर बालाघाट वाचवले नाहीत, तर पुढच्या पिढ्यांना डोंगर, झाडं, निसर्ग यांची फक्त चित्रांतून ओळख करून द्यावी लागेल.जनतेच्या नजरेत प्रशासनाची भूमिका संशयास्पद ठरत आहे. खनिज माफियांशी संगनमताचा संशय बळावत असून, पर्यावरण प्रेमी व नागरिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. आता प्रशासनाने तात्काळ कडक कारवाई केली नाही, तर बालाघाटाचा फक्त इतिहासच उरेल, भूगोल नाही, असा सूर उमटू लागला आहे.